ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# मोबाईल आधारीत महाविद्यालयीन ग्रंथालयीन सेवा

**शिंदे सिध्दार्थ बाबूराव**
ग्रंथपाल, कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे
कला महाविद्यालय, गंगाखेड. जि. परभणी.

**सार :-**

आजच्या युगात अन्न, वस्त्र व निवारा याप्रमाणेच मोबाईल व इंटरनेट हे पण मानवी जीवनासाठी अत्यावश्यक बाबी झालेल्या आहेत. मोबाईल हे फक्त संवादाचे माध्यम न राहता ते माहिती मिळविण्याचे साधन बनलेले आहे. त्यामूळे इतर क्षेत्राप्रमाणे महाविद्यालयीन ग्रंथालयीन सेवा देत असताना मोबाईल आधारीत सेवा देण्यावर भर दिला पाहिजे. मोबाईलच्या व इंटरनेटच्या वापरामूळे जगाला एका खेडयाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. आज सामान्यातला सामान्य मानव असो कि संस्था ती इंटरनेटच्या माध्यमामूळे माहितीच्या संदेशावहनात वेगाने वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. पुर्वी एखादी नविन माहिती शोधण्यासाठी वाचकाला ग्रंथालयात किंवा त्यासंबधीत ग्रंथ, मासिक, दैनिक वर्तमानपत्र याची वाट पाहावी लागत असे पण मोबाईलच्या वापरामूळे त्वरीत माहिती मिळण्यास मदत होत आहे. एकंदरितच मोबाईलचा योग्य वापर म्हणजे माहिती प्राप्त करण्याचे एक चांगले साधन असल्याचे दिसून येत आहे.

**कि वर्डस** :- ग्रंथालय, ग्रंथालय सेवा

**प्रस्तावना :-**आपल्या देशात इंटरनेटचा वापर जगातील अन्य देशाच्या तुलनेत सर्वाधिक असल्याचे दिसून येते. भारतात मोबाईलच्या माध्यमातून इंटरनेट वापरत असलेल्याची संख्या पण कोटीमध्ये आहे. भारतातील सुप्रसिध्द जिओ कंपनीने कोणालाही परवडतील असे स्मार्ट फोन व इंटरनेट प्रती दिन दहा रूपयापेक्षा कमी किमतीत उपलब्ध करून दिल्यामूळे इंटरनेटच्या वापरात खुपचे वेगाने वाढझाली आहे. एरिक्सन या कंपनीने केलेल्या सर्वेक्षणानुसार येत्या चार वर्षामध्ये भारतातील स्मार्ट फोनधारकाची संख्या 110 कोटीपेक्षा असेल तर या माध्यमातून इंटरनेट वापरत असलेल्याची संख्या 61 कोटीवर पाहोचेल [1] असे मत त्यांनी मांडले आहे. साधारण पाच ते सहा वर्षापूर्वी मोबाईल म्हणजे फक्त शहरी व श्रीमंत वर्गासाठीच वापरावयाचे साधन यानुसार त्याचा विचार केला जात असे. पण स्वस्त मोबाईल व परवडतील अशा इंटरनेटच्या दरामूळे देशातील मोबाईल वापरत असलेल्यांची संख्या वार्षीक 35 टक्के वेगाने वाढत असल्याचे दिसून येत आहे.[2] थोडक्यात इंटरनेट हे शहरी तसेच श्रीमंत लोकापुरते मर्यादीत न राहता आता ते सर्वसामान्य माणसांच्या आवाक्यात आले असल्याचे दिसून येत आहे. महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचकाचा जर विचार केला तर मोबाईल वापराचे त्यांचे प्रमाण पण वेगाने वाढत असल्याचे दिसून येत आहे. सुरूवातीला शहरी भागातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यामध्ये मोबाईल वापराचे प्रमाण जास्त होते. पण सध्या महाविद्यालय शहरी असो की ग्रामीण तेथील वाचकामध्ये मोबाईल वापरात वाढ होताना दिसून येत आहे. यामूळे महाविद्यालयीन ग्रंथालयीन सेवा देत असताना मोबाईल वर आधारीत जर सेवा देण्याचा प्रयत्न केला तर ग्रंथालयीन सेवेत वाढ होईल व वाचकाना प्रभावी सेवा देण्यास मदत होईल. म्हणूनच आधूनिक काळाची गरज म्हणजे मोबाईल आधारीत ग्रंथालयीन सेवा देणे होय. काही ग्रंथालयानी हि सेवा देण्यास सुरूवात केली आहे पण त्याचा जास्तीत जास्त प्रसार होणे हि काळाची गरज आहे.

**ग्रंथालय :-** ज्या ठिकाणी ग्रंथ एकत्रित केले जातात ती

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

जागा म्हणजे ग्रंथालय.[3]

**ग्रंथालय सेवा :-** ग्रंथाचा उपयोग करण्यासाठी व माहितीच्या प्रसारणासाठी ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या सुविधा.[4]

**मोबाईल आधारीत महाविद्यालयीन ग्रंथालयीन सेवा :-**मोबाईल ही आजकाल अत्यावश्यक गरज बनली आहे. सर्वच कामे करण्यामध्ये मोबाईलचा वापर करण्याचे प्रमाण वाढत आहे. ग्रंथालयाने पण मोबाईल वर आधारीत सेवा देण्यावर भर देणे सुरूवात केले पाहिजे. कोणत्या कोणत्या सेवा मोबाईलच्या माध्यमातून देण्यात येवू शकतात याची आखणी करून वाचकांना प्रभावीपणे सेवा देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मोबाईल सारख्या तंत्रज्ञानाचा वापर ग्रंथालयीन सेवा देताना केला तर वाचक तसेच ग्रंथालय कर्मचारी यांचा वेळ वाचेल व ग्रंथालय शास्त्रातील सिध्दांताप्रमाणे वाचकांचा वेळ वाचला पाहिजे या सिध्दांताची पुर्तता होण्यास मदत होईल. म्हणूनच मोबाईल आधारीत सेवा देण्यावर भर देणे महत्वाचे आहे.

**1. ग्रंथालयाचा नकाशा तसेच रचना वाचकाना माहित करून देणे :-**महाविद्यालयीन ग्रंथालयाचे मोबाईल ॲप तंत्रज्ञाकडून तयार करून घेणे व त्याचा वापर करण्यासाठी वाचकांना प्रोत्साहीत करणे गरजेचे आहे. त्यांना या माध्यमातून ग्रंथालयाचा नकाशा तसेच ग्रंथालयाची रचना याबाबत माहिती पुरविता येते. ग्रंथालय लहान असेल तर याची म्हणावी तशी आवश्यकता पडत नाही पण ग्रंथालय जर मोठे असले तर वाचकांचा गोंधळ वाढतो. त्याचा वेळ वाया जावू शकतो. म्हणून ग्रंथालयाची रचना वाचकांना कोणाच्याही मदतीशिवाय माहिती होण्यासाठी मोबाईल सेवेचा प्रभावीपणे वापर करता येवू शकतो.

**2. अलर्ट सेवा देणे :-**ग्रंथालयामार्फत विविध प्रकारच्या सेवा देण्यात येत असतात. तसेच ग्रंथालयामार्फत विविध सेवा देण्यासाठी वाचकांना अलर्ट सेवा देणे गरजेचे आहे. वाचकांना ग्रंथ देवघेव संदर्भात तसेच वसुल केले जाणारे शुल्क यांसबधीत माहिति पुरविणे गरजेचे असते. हि माहिती पुरविण्यासाठी ग्रंथालयातील मनुष्यबळाच्या कमतरतेमूळे शक्य होत नाही. अशा वेळेस मोबाईल आधारीत ई मेल अलर्ट हि सेवा देवून वाचक तसेच संबधीत कर्मचारी यांचा वेळ वाचतो व त्यांना इतर कार्यासाठी वेळ पण मिळतो.

**3. देवघेव सेवा :-**वाचकांना ग्रंथ देवघेवीसाठी तसेच ग्रंथ आरक्षणासाठी ग्रंथालयात जावे लागत असते. या सेवा जर मोबाईल आधारीत केल्या तर वाचकाला आवश्यक असलेले ग्रंथ किंवा इतर माहिती ग्रंथालयात आहे की नाही ते समजण्यास मदत होते. तसेच देवघेव संदर्भात जर काही माहिती पाहिजे असेल तर मोबाईलच्या माध्यमातून सेवामूळे दिवसातील कोणत्याही वेळी कार्यालयाचे वेळेचेबंधन न पाळता त्याला माहिती मिळू शकते. म्हणून देवघेव सेवा प्रभावीपणे देण्यासाठी मोबाईल आधारीत सेवा देणे हि काळाची गरज आहे.

**4. मोबाईल संकेतस्थळ :-**सध्या सर्वच महाविद्यालयीन ग्रंथालये हि संगणकावर दिसणारे संकेतस्थळ तयार करून घेत आहेत. याचबरोबर त्यांनी मोबाईल पण दिसणारे संकेतस्थळ तयार करून घ्यायला पाहिजे कारण सर्वच वाचकाकडे संकेतस्थळावरील माहिती पाहण्यासाठी संगणक उपलब्ध असेलच असे नाही. म्हणून मोबाईल वर दिसणारे संकेतस्थळ जर असेल तर वाचकासाठी ती चांगली बाब असेल. म्हणून संगणक तसेच मोबाईल वर चालणारे संकेतस्थळ तयार करून घेणे गरजेचे आहे.

**5. ग्रंथ व इतर वाचनिय माहिती शोधणे :-** महाविद्यालयीन ग्रंथालयानी वाचकांना मोफत असलेल्या संकेतस्थळाच्या लिंक्स ग्रंथ व इतर वाचनिय साहित्य शोधण्यासाठी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. सर्वच वाचकाला संगणक उपलब्ध करून देणे शक्य नसते. तसेच कार्यालयीन वेळेचे पण बंधन असते. अशा वेळेस

मोबाईलवर इंटरनेटच्या माध्यमातून माहिती शोधणे सहज आणी सोपे असते. म्हणून वाचकासाठी अशा माहिती शोधण्यासाठी मदत करणे हे खुपच गरजेचे आहे.

**6. ग्रंथालयाशी संबधीत उपक्रम व कार्यक्रमाची माहिती देणे :-**ग्रंथालय विविध प्रकारचे उपक्रम तथा कार्यक्रमाचे आयोजन करीत असते. अशा उपक्रमाची किंवा कार्यक्रमाची माहिती वाचकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रभावी अशा मोबाईल सेवेची आवश्यकता भासते. याची माहिती देण्यासाठी मोबाईल सेवेच्या माध्यमातून विविध प्रकारचा अवलंब करण्यात येवू शकतो. पुर्वी अशी माहिती देण्यासाठी सुचना काढणे व इतर बाबीचा अवलंब केला जात असे. पण सध्या या सेवेच्या माध्यमातून खुपच जलद प्रकारे याची माहिती देता येते.

**7. नविन वाचन साहित्याची माहिती पुरविणे :-**ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथनच्या यांच्या पाचव्या सिध्दांताप्रमाणे ग्रंथालय हि वाढणारी संस्था आहे. नियमित कालावधीने ग्रंथालयात ग्रंथ व इतर वाचनसाहित्य येत असते. या सर्व वाचनसाहित्याचा प्रसार करण्यासाठी तसेच वाचकांना नविन घेण्यात आलेल्या वाचनसाहित्या बाबत अवगत करण्यासाठी मोबाईल सेवेचा प्रभावी वापर करता येतो. नविन ग्रंथ व इतर वाचनसाहित्याची माहिती प्रत्येक वाचकापर्यंत पाहोचविण्यासाठी या सेवेचा वापर करता येतो.

**8.संदर्भ सेवा पुरविणे :-**मोबाईल सेवेचा सर्वात जास्त प्रभावी वापर संदर्भ सेवा पुरविण्यासाठी करता येतो. मोबाईल सेवच्या माध्यमातून संदर्भ सेवा पुरविल्यामूळे वाचकांचा वेळ वाचला पाहिजे या ग्रंथालय शास्त्रातील सिध्दांताची परीपुर्ती होताना दिसून येते. किरकोळ माहिती घेण्यासाठी वाचकांला मोबाईल सेवेच्या माध्यमातून संदर्भ सेवा देता येते. यासाठी एस. एम. एस., चॅटींग व ईमेलचा वापर करता येवू शकतो म्हणून हि सेवा देण्यासाठी मोबाईल या माध्यमाचा वापर करता येवू शकतो.

**9. मोबाईल डेटाबेसेसची सेवा देणे :-** वाचकासाठी विविध डेटाबेसेस संगणक तसेच मोबाईलवर वापरता येतील असे उपलब्ध आहेत. महाविद्यालय पण आवश्यकतेनुसार वाचकासाठी काही डेटाबेसेस घेत असते. अशा वेळेस हे डेटाबेसेस मोबाईलवर पण वापरता येतील असे घेण्यावर भर दिला पाहिजे. सध्या सर्वच वाचकांचा भर मोबाईल वापरण्यावर असल्यामूळे तसेच त्याला वेळेचे बंधन नसल्यामूळे अशा माध्यमातून डेटाबेसेसची सेवा दिली तर वाचकांना ती सुवर्ण संधी ठरू शकते.

**10. आंतर ग्रंथालयीन सेवा पुरविणे :-**कोणत्याही ग्रंथालयात वाचकांना आवश्यक असेल असे सर्व वाचनसाहित्य असू शकत नाही. अशा वेळेस आंतर ग्रंथालय सहकार्याच्या माध्यमातून आपल्या ग्रंथालयातील तसेच आंतर ग्रंथालयातील वाचनसाहित्याचा लाभ वाचकांना मिळू शकतो. याच्यामूळे ग्रंथालयाची व्याप्ती तसेच तिचा वापर पण वाढतो. ग्रंथालयात उपलब्ध नसलेले वाचन साहित्य इतर ग्रंथालयातून वाचकांना मिळू शकते. यासाठी मोबाईल सेवेचा माध्यमातून दोन्ही ग्रंथालयातील वाचनसाहित्य वाचकासाठी उपलब्ध करून देता येते.

**11. ग्रंथालय आभासीसहलीची माहिती देणे :-**दरवर्षी महाविद्यालयात नविन विद्यार्थी प्रवेश घेत असतात तसेच स्थानिक नागरिक पण ग्रंथालयात माहिती शोधण्यासाठी येत असतात. या वाचकांना ग्रंथालयात येवून माहिती शोधणे हे वेळ घेणारे असू शकते. अशा वाचकांना आभासी सहलीच्या मार्फत ग्रंथालयाची रचना कशी आहे तसेच त्यांना आवश्यक असणारी माहिती कोठे मिळेल हे समजण्यासाठी खुपच लाभदायक आहे. अशा आभासी सहलीमुळे वाचक व ग्रंथालयीन कर्मचारी यांचा वेळ वाचतो. म्हणून मोबाईल सेवेच्या माध्यमातून

हि सेवा देता येते.

**12. मोबाईल वर ओपॅक सेवा म्हणजेच मोपॅक सेवा देणे :-**मोपॅक हि सेवा म्हणजेच मोबाईल वर ग्रंथ शोधण्यासाठी वापरात येणारी ओपॅक सेवा होय.ओपॅक तसेच वेब ओपॅक सेवा वरून माहिती मिळविण्यासाठी सदर ग्रंथालय आज्ञावलीस मदत करत असलेल्या संगणकावरच शोधावी लागते. पण मोबाईल वर सपोर्ट करणारी मोपॅक हि सेवा देवून वाचकांना वेळेच्या बंधनातून मुक्त करता येते. मोबाईलच्या माध्यमातून वाचकांना हि सेवा देवून वाचक आपला वेळ वाचवू शकतात. म्हणून प्रत्येक ग्रंथालयाने मोपॅक हि सेवा देणे गरजेचे आहे.

**13. CAS & SDI सेवा देणे :-**मोबाईल सेवेच्या माध्यमातून वाचकाना आवश्यक असलेली CAS व SDI सेवापरिणाम कारक रितीने देता येते. या सेवा दिल्यामुळे वाचकांना त्वरीत नविन माहिती मिळविता येते. तसेच त्यांना आवड असलेल्या विषयामधील नविन माहिती मिळण्यासाठी मदत होते. ग्रंथालयाची उपयुक्तता समजण्यासाठी या सेवेचा वापर कशा आहे ते पाहिले जाते. मोबाईलच्या माध्यमातून जर अशा प्रकारची सेवा दिली तर वाचकांना उपयुक्त ठरून विविध प्रकारच्या सेवेचा प्रसार होण्यास मदत होईल.

**14. ई रिर्सोसचे वितरण करणे :-**ग्रंथालयात विविध प्रकारचे ई रिर्सोसेस उपलब्ध असतात. ग्रंथालयात ई रिर्सोसेसच्या माध्यमातून माहिती शोधण्यासाठी मर्यादीत प्रमाणात संगणक उपलब्ध असतात. अशा वेळेस मोबाईल सेवेच्या माध्यमातून याचे वितरण प्रत्येक वाचकापर्यंत करता येते. म्हणून मोबाईल सेवेच्या माध्यमातून पुरविता येणारी हि एक प्रभावी सेवा आहे.

**समारोप :-**एकंदरीत आधूनिक काळाची गरज म्हणजे मोबाईल आधारीत ग्रंथालयीन सेवा देणे होय. काही ग्रंथालयानी हि सेवा देण्यास सुरूवात केली आहे. पण सर्वच महाविद्यालयानी याचा वापर करण्यास चालु केले पाहिजे. यामूळे माहितीचे प्रसारण तसेच देवाणघेवाण जलद होण्यास मदत होईल. मोबाईलच्या अतिवापराने वाचक हे ग्रंथालयापासून दुर होत आहेत. त्यांना ग्रंथालयीन सेवा तसेच इतर उपक्रमाची माहिती करून देवून वाचकांना ग्रंथालयामार्फत प्रभावी सेवा देण्यास मदत होईल. थोडक्यात आधुनिक काळाप्रमाणे ग्रंथालयानी बदल स्विकारून मोबाईल आधारीत सेवा देण्यावर जर भर दिला वाचकाचा वेळ तर वाचेलच तसेच ग्रंथालयीन कर्मचारी वर्गावरील पण ताण कमी होण्यास मदतच होईल.

संदर्भ :-

1. *संपादकिय, विदानंद शिव सुंदर ते...... दै. लोकसत्ता - दि. 2 मार्च 2020*

2. *गवाणकर चिन्मय आणि तेंडूलकर आशिष, इंटरनेटच्या चष्म्यातून निवडणूक दै. लोकसत्ता - दि. 21 जुलै 2020*

3. *कोण्णूर एम. बी. आणि कोण्णूर सुजाता. (2008). डायमंड ग्रंथालय व माहितीशास्त्रकोश. पुणे, डायमंड पब्लीकेशन्स.*

4. *सातारकर सु. प्र. आणि अघाव उ. रा. (2013). ग्रंथालय व माहितीशास्त्र परिभाशा कोश. पुणे, डायमंड पब्लीकेशन्स.*